ePaper

**अजितदादांकडून काँग्रेसचा करेक्ट कार्यक्रम, राज्यात मोठा धक्का!**

| वर्ष - 9 । अंक - 3 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- आशिया चषकासाठी बुमरा सज्ज!
- म्युनिकला जर्मन सुपर चषकाचे जेतेपद
- निवडणुकीसाठी विरोधकांचे रणशिंग!
- सत्तेत असताना अन्याय्य कायदे!

www.mahaenews.com | सोमवार, दि. 18 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**राहुल गांधींना आव्हान!** सात दिवसांत माफी मागा, 'मतचोरी' वरून निवडणूक आयोग

# राहुल गांधी @ डेंजर झोन!

## देशाची माफी मागा : आयुक्त : काँग्रेसकडूनही आयोगावर पलटवार, अन्य प्रश्न केले उपस्थित!

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या आरोपानंतर निवडणूक आयोगही आता संतापला असून राहुल गांधींचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. राहुल यांनी शपथपत्र दिले नाहीत तर देशाची माफी मागावी, अशी मागणी आयोगातर्फे करण्यात आली आहे. आयोगाच्या या खंबीर भूमिकेमुळे राहुल गांधी मात्र आता 'डेंजर झोन' मध्ये आहेत, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.**



### मत चोरीचे आरोप फेटाळले..

भारतीय निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन विरोधकांचे मतचोरीचे आरोप फेटाळून लावले. विशेष म्हणजे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राहुल गांधी यांना थेट इशाराच देऊन टाकला आहे. पुढील सात दिवसांत शपथपत्र द्या, अन्यथा माफी मागा असे म्हणत ज्ञानेश कुमार यांनी राहुल गांधींना चांगलेच सुनावले आहे.

### सर्व आयोग बिनबुडाचे..

निवडणुकीसंदर्भात करण्यात आलेल्या आरोपांबाबत सात दिवसांच्या आत शपथपत्र आल्यास राहुल गांधी यांनी केलेले आरोप बिनबुडाचे आहेत असे सिद्ध होईल. फक्त एक पीपीटी दाखवून चालणार नाही, असे ज्ञानेश कुमार यांनी म्हटले आहे. राहुल गांधी हे नुसते आरोप करीत असतात त्यांच्याकडे काहीच पुरावे नाहीत, असेही ते राहुल गांधी यांचे नाव न घेता म्हणाले.

### 'पीपीटी' मधील आकडे आयोगाचे नाहीत..

टीव्हीवर दाखवण्यात आलेल्या पीपीटीत निवडणूक आयोगाचे आकडे नाहीत. चुकीचे आकडे दाखवून पोलिंग ऑफिसरनेच एका महिलेने दोन वेळा मतदान केल्याचे सांगितल्याचा दावा करणे चुकीचे आहे. अशा प्रकारच्या गंभीर विषयांत शपथपत्राशिवाय निवडणूक आयोग काम करणार नाही, असे निवडणूक आयुक्तांनी ठणकावून सांगितले आहे.

### आयोगाच्या डोक्यावर बंदूक कशासाठी ?

निवडणूक आयोगाच्या डोक्यावर बंदूक ठेवून राजकारण केले जात आहे, असा आरोपही त्यांनी केला. तसेच निवडणूक न घाबरता मतदारांच्या पाठीशी आहे, असेही यावेळी ज्ञानेश कुमार यांनी बोलून दाखवले. दरम्यान, एक तर केलेल्या आरोपांबाबत शपथपत्र द्या किंवा देशाची माफी मागा, या निवडणूक आयुक्तांच्या आव्हानाला राहुल गांधी नेमके काय उत्तर देणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### आयुक्तांना काँग्रेसचा सवाल..

निवडणूक आयोगाच्या मुद्द्यांवर काँग्रेसने अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार गुप्ता यांच्यावर पलटवार केला आहे. यामुळे काँग्रेस आणि निवडणूक आयोग यांचा सामना सुरुच असल्याचे दिसून येते.

### एस. आय. आर. चे नेमके काय?

बिहारमध्ये सुरु असलेल्या स्पेशल इंटेन्सिव रिव्हिजन चा उद्देश मतदार यादीतील त्रुटी दूर करणे हा आहे. मात्र, त्या संदर्भात भ्रम फैलावण्यात येत आहे आणि निवडणूक आयोगाच्या खांद्यावर बंदूक ठेवत राजकारण काही लोक करत आहेत, असे ज्ञानेश कुमार गुप्ता म्हणाले होते. याला पवन खेरा यांनी उत्तर दिले आहे. पवन खेरा म्हणाले की आम्ही कोणत्या मतदाराच्या खांद्यावर बंदुक ठेवत राजकारण करत नाही. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी तुमच्या नाजूक खांद्यावर बंदूक ठेवत लोकशाहीची हत्या करत आहेत.

### ही तर भाजपाची स्क्रिप्ट..

पवन खेरा म्हणाले की ज्ञानेश कुमार गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत जे म्हटले ते ऐकून असे वाटले की भाजपची स्क्रिप्ट होती. राहुल गांधी यांनी विविध मुद्दे ठेवले होते, तथ्य मांडले होते, सहा महिन्यांच्या परिश्रमानंतर निवडणूक आयोगाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे माहिती ठेवली होती. निवडणूक आयोगाने महादेवपुरा विधान सभा निवडणुकीबाबत काहीच म्हटले नाही, असेही पवन खेरा म्हणाले.

### चारदा नावे, पण मतदान एकदाच..

पवन खेरा म्हणाले, की ज्ञानेश कुमार गुप्ता म्हणाले की एका व्यक्तीचे नाव अनेक ठिकाणी नोंदवले असेल तर काय झाले, तो व्यक्ती एकदाच मतदान करु शकतो. आमचा थेट प्रश्न आहे की गुप्ताजी हा युक्तिवाद न्यायालयात प्रतिज्ञापत्राद्वारे मांडण्यास तयार आहेत का? आयोगाने काही लोकांना मृत जाहीर केले होते, त्यांच्यासोबत राहुल गांधी यांनी चहा घेतला, असे पवन खेरा म्हणाले.

## निवडणूक आयोग सरकारचा एजंट

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सांगितले की मोदी सरकारने २०२३ मध्ये एक कायदा आणला. या कायद्यानुसार, निवडणूक आयोगाच्या अध्यक्ष किंवा सदस्याने काही चूक केली तरी त्यांच्याविरुद्ध कोणताही एफआयआर किंवा फौजदारी खटला दाखल करता येत नाही.म्हणजे सरकारने २०२३ मध्ये तयारी केली आणि २०२४ मध्ये फसवणूक केली. या लोकांनी मते चोरली आहेत, म्हणून आपल्याला आता या चोरांना हटवावे लागेल, असेही खर्गे म्हणाले.

### निवडणूक आयोगाला लाज नाही..

निवडणूक आयोगाला लाज वाटली नाही. ते म्हणतात सीसीटीव्ही फुटेज जर दिले तर गोपनीयतेचा भंग होईल. मग ते रेकॉर्ड कशासाठी केले जाते. पवन खेरा आयुक्तांबाबत म्हणाले की तुमचं वय सध्या भाजपचे एजंट होण्याचे नाही. तुम्ही कितीही निवडणुकीची चोरी करा. लवकरच नवे सरकार येईल, असे ही खेरा यांनी सांगितले .

### महुआ मोईत्रा यांचा आरोप..

तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी देखील निवडणूक आयोगावर टीका केली आहे. त्या म्हणाल्या की मुख्य निवडणूक आयुक्तांच्या मते बिहारमध्ये मृत मतदारांची संख्या २२ लाख असून गेल्या सहा महिन्यात नव्हे कित्येक वर्षां पूर्वी मेलेले आहेत. मात्र, त्याचं रेकॉर्ड नोंदवण्यात आले नाही. महुआ मोईत्रा पुढे म्हणाल्या की जर असे असेल तर निष्पक्ष निवडणुकीत बाधा आणली म्हणून गेल्या काही वर्षांमधील निवडणूक आयोगाचे सर्व कर्मचारी, मुख्य निवडणूक आयुक्त सर्वांना तुरुंगात पाठवले पाहिजे.

प्रत्यारोपण शस्त्रक्रिया

## ससूनमध्ये अगदी कमी खर्चात मूत्रपिंड प्रत्यारोपण यशस्वी

# मदतनीस महिलेमुळे मुलीला जीवदान!

## कुटुंबांची आर्थिक स्थिती हलाखीची



। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एका महिलेच्या प्रसूतीदरम्यान झालेल्या गुंतागुंतीमुळे दोन्ही मूत्रपिंडे निकामी झाली. केवळ मूत्रपिंड प्रत्यारोपण हाच पर्याय शिल्लक होता. त्यामुळे अंगणवाडी मदतनीस असलेली तिची आई मूत्रपिंड देण्यासाठी पुढे आली. कुटुंबांची आर्थिक स्थिती हलाखीची असल्याने खासगी रुग्णालयात प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करणे शक्य नव्हते. अखेर ससून सर्वोपचार रुग्णालयात अगदी कमी खर्चात ही प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली.**

पुण्यातील रहिवासी असलेल्या या महिलेची प्रसूती २०२२ मध्ये झाली. त्यावेळी उच्च रक्तदाबामुळे मूत्रपिंडविकाराचे निदान झाले. तिचे माहेर कर्नाटकमधील विजयापुरा येथे आहे. तिथेच तिच्यावर उपचार सुरू होते. तिने वर्षभर उपचार घेऊनही मूत्रपिंडे निकामी झाली. अखेर तेथील डॉक्टरांनी तिला प्रत्यारोपण करण्याचा सल्ला दिला. यानंतर अंगणवाडी मदतनीस असलेली या महिलेची आई आणि इतर नातेवाइकांनी तिथे प्रत्यारोपणासाठी खासगी रुग्णालयात चौकशी सुरू केली. सगळीकडील खर्चाचा १५ ते २० लाख रुपयांचा आकडा ऐकून त्यांनी प्रत्यारोपणाचा विषय सोडून दिला. ही रुग्ण महिला दरम्यानच्या काळात डायलिसिसवर होती. या रुग्ण महिलेचा पती चालक म्हणून पुण्यात काम करतो. त्याला ससूनमध्ये कमी खर्चात प्रत्यारोपण होत असल्याची माहिती मिळाली. त्याने ससून रुग्णालयात चौकशी केल्यानंतर हे शक्य असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. नात्यातील एखाद्या व्यक्तीने मूत्रपिंड दान दिल्यास तातडीने प्रत्यारोपण शक्य होईल, अशी माहिती ससूनमधील अवयव प्रत्यारोपण समन्वयक सत्यवान सुरवसे यांनी कुटुंबीयांना दिली.

त्यानंतर रुग्ण महिलेची आई मूत्रपिंड देण्यासाठी पुढे आली.मूत्रविकारतज्ज्ञ डॉ. संदीप मोरखंडिकर आणि डॉ. निरंजन आंबेकर यांच्या सल्ल्यानुसार रुग्ण महिलेच्या आईचे मूत्रपिंड घेण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार आईच्या आवश्यक त्या सर्व तपासण्या करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. अखेर ७ ऑगस्टला या महिलेवर मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. डॉ. पद्मसेन रणबागले, डॉ. लता भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली ही शस्त्रक्रिया करण्यात आली. यात डॉ. हरिदास प्रसाद, डॉ. संजय मुंडे, डॉ. निरंजन आंबेकर, डॉ. संदीप मोरखंडीकर, डॉ. सुरेश पाटणकर, डॉ. राजेश श्रोत्री, डॉ. हर्षद तोष्णीवाल, डॉ विवेक बारेकर यांचा सहभाग होता. ससूनमध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया कमी खर्चात आणि महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत केल्या जातात. याव्यतिरिक्त रुग्णांना रुग्णालयात उपलब्ध नसलेली औषधे, लशी, शस्त्रक्रियेसाठी आवश्यक साहित्य, शस्त्रक्रियेनंतरच्या आवश्यक रक्त, लघवी व अन्य प्रकारच्या तपासण्यांसाठी खर्च करावा लागतो. सवलतीच्या दरात सर्व औषधे व तपासण्या उपलब्ध करून दिल्यामुळे हा खर्चही कमीतकमी होतो. यासाठी सामाजिक संस्थांकडून मदत मिळवून दिली जाते.

### तातडीने प्रत्यारोपण शक्य होईल

तातडीने प्रत्यारोपण शक्य होईल, अशी माहिती ससूनमधील अवयव प्रत्यारोपण समन्वयक सत्यवान सुरवसे यांनी कुटुंबीयांना दिली. त्यानंतर रुग्ण महिलेची आई मूत्रपिंड देण्यासाठी पुढे आली. मूत्रविकारतज्ज्ञ डॉ. संदीप मोरखंडिकर आणि डॉ. निरंजन आंबेकर यांच्या सल्ल्यानुसार रुग्ण महिलेच्या आईचे मूत्रपिंड घेण्याचे निश्चित करण्यात आले.

पुण्यातील रहिवासी असलेल्या या महिलेची प्रसूती २०२२ मध्ये झाली. त्यावेळी उच्च रक्तदाबामुळे मूत्रपिंडविकाराचे निदान झाले.

तिचे माहेर कर्नाटकमधील विजयापुरा येथे आहे. तिथेच तिच्यावर उपचार सुरू होते. तिने वर्षभर उपचार घेऊनही मूत्रपिंडे निकामी झाली. अखेर तेथील डॉक्टरांनी तिला प्रत्यारोपण करण्याचा सल्ला दिला. यानंतर अंगणवाडी मदतनीस असलेली या महिलेची आई आणि इतर नातेवाइकांनी तिथे प्रत्यारोपणासाठी खासगी रुग्णालयात चौकशी सुरू केली. पुण्यात काम करतो. प्रत्यारोपण होत असल्याची माहिती मिळाली. त्याने ससून रुग्णालयात चौकशी केल्यानंतर हे शक्य असल्याचे त्याच्या निदर्शनास आले.

# पुण्यात अण्णा हजारे विरोधात बॅनरबाजी

## जंतर-मंतर मैदानावर पुन्हा तुमची जादू पाहण्यासाठी देश आतुर




। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**काँग्रेस पक्षाचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाचा डेटा दाखवत मतांची चोरी झाल्याचे दाखविले.त्यावरून विरोधक आक्रमक होत रस्त्यावर देखील उतरले,त्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळाले. त्या सर्व घडामोडी दरम्यान जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना लक्ष्य करणारे फ्लेक्स पुण्यातील पाषाण येथील रस्त्यावर लावण्यात आले आहे.**

अण्णा आता तरी उठा.... कुंभकर्णसुद्धा गाढ झोपेतून रावणासाठी आणि लंकेसाठी उठला होता... तुम्ही आपल्या देशासाठी आता तरी उठा..... होय मतांची चोरी आहे. INDIA AGAINST VOTECHORI देशात मतांची चोरी होत असताना,देशात भ्रष्टाचार फोफावला असताना,देशात हुकूमशाही माजलेली असताना,देशाची लोकशाही धोक्यात असताना. अण्णा तुमच्या सारखा जेष्ठ गांधीवादी समाजसेवक शांत कसा?अण्णा, दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर पुन्हा तुमची जादू पाहण्यासाठी देश आतुर आहे. अशा आशयाचे बॅनर लावण्यात आला आहे.तर या अनोख्या फ्लेक्स बाजीची पुणे शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे.अण्णा आता तरी उठा....कुंभकर्णसुद्धा गाढ झोपेतून रावणासाठी आणि लंकेसाठी उठला होता... तुम्ही आपल्या देशासाठी आता तरी उठा..... होय मतांची चोरी आहे. INDIA AGAINST VOTECHORI देशात मतांची चोरी होत असताना,देशात भ्रष्टाचार फोफावला असताना,देशात हुकूमशाही माजलेली असताना,देशाची लोकशाही धोक्यात असताना.

### राजकीय वर्तुळात चर्चा

अण्णा, दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर पुन्हा तुमची जादू पाहण्यासाठी देश आतुर आहे.अशा आशयाचे बॅनर लावण्यात आला आहे.तर या अनोख्या फ्लेक्स बाजीची पुणे शहराच्या राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे.काँग्रेस पक्षाचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाचा डेटा दाखवत मतांची चोरी झाल्याचे दाखविले.

कृती योजना तयार | पीएमआरडीएच्यावतीने महत्त्वाकांक्षी प्रकल्प

# 'पवना'चे प्रदूषण रोखण्यासाठी 1157 कोटी!

## पीएमआरडीए पवना नदीकाठच्या ५४ गावांमध्ये राबविणार योजना

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पवना नदीतील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी आणि नदीचे शुद्धीकरण करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्या वतीने तब्बल ११५७ कोटी रुपयांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आखण्यात आला आहे. पवना नदीच्या दुर्गंधीमुळे ५४ गावांमध्ये हा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. या कालावधीत जलशुद्धीकरणासाठी सविस्तर कृती योजना तयार केली आहे. त्यासाठी २० कोटींचा खर्च अपेक्षित आहे.**






प्रकल्पांतर्गत एकूण ९१ कि.मी सांडपाणी वाहिन्या टाकण्यात येणार आहेत. त्यातही पिंपरी, परंदवडी, माळवडी, शिरसाट, ढमाळे, गोडंब, साळुंबे आणि सांगवी या गावांची निवड करण्यात आली आहे. ही केंद्रे १५ वर्षे देखभाल व संचालनास अटींसह कार्यरत असणार आहे. प्रकल्प हल्ली झालेल्या २६ राज्य बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार डिसेंबर २०२९ पर्यंत प्रकल्प पूर्ण करायचा येणार आहे. हा कालावधी जास्त असल्याने नदी प्रदूषण रोखण्यासाठी तातडीच्या उपायोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

पवना नदीवर पवनानगर येथे धरण आहे. दापोडी येथे मुळा नदीशी तिचा संगम होतो. हे अंतर ६० किलोमीटर आहे. यात 'पीएमआरडीए' हद्दीत ३५ किलोमीटर, तर पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत २५ किलोमीटर नदी वाहते. पवना नदी प्रदूषण नियंत्रणाचा सविस्तर प्रकल्प अहवाल ४ फेब्रुवारी रोजी राज्य शासनास पाठविला होता. या ६० किलोमीटरमधील नदी प्रदूषण रोखण्यासाठी ११७१ कोटींचा एकत्रित सविस्तर प्रकल्प अहवाल १८ जुलै रोजी सादर केला आहे. मान्यतेनंतर हा सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र शासनाच्या 'एनआरसीडी'कडे मान्यतेकरिता पाठविण्यात येणार आहे.

### तातडीच्या उपाययोजना:

पवना नदीपात्रात जलपर्णी व तरंगणारे कचरा हटवा.
फ्लोटिंग एरेटर्स बसवावेत.
प्रदूषण नियंत्रणासाठी मोबाइल किंवा मॉड्यूल एसटीपींची व्यवस्था करावी.
सांडपाणी प्रवाहावर उपचार केंद्रांची किंमत ठरवणे (फेन्सिंग/बॉर्डिंग).
जनजागृतीची प्रभावी माहिती, प्रसार व संवाद (आयईसी) मोहिम.

"पवना नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी आणि नदी पुन्हा एकदा प्रवाही व स्वच्छ होण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दोन ते अडीच महिन्यांत उपाययोजनांच्या कामाला सुरुवात होणार आहे.

**- योगेश म्हसे,** महानगर आयुक्त, पीएमआरडीए

# शहरात दररोज सापडतोय एक डेंग्यूचा रुग्ण

## 14 दिवसांत 12 जणांना डेंग्यूची लागण; आरोग्य यंत्रणा सतर्क: 7 लाख घरांची तपासणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहरात ऑगस्ट महिन्यात डेंग्यूच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. मागील १४ दिवसांत १२ जणांना डेंग्यूची लागण झाली असून, एकूण रुग्णसंख्या ३३ झाली आहे. तर, मलेरियाचे २७ रुग्ण आढळले आहेत. डेंग्यू, मलेरियासारखे कीटकजन्य आजार रोखण्यासाठी 7 लाख घरांची तपासणी करण्यात आल्याचे महापालिकेने सांगितले.**



पिंपरी-चिंचवडमध्ये जून महिन्यात २, जुलै महिन्यात १९ डेंग्यूचे रुग्ण आढळले होते. ऑगस्ट महिन्यात आतापर्यंत ११ हजार ८० तापाचे रुग्ण आढळले आहेत. यामध्ये डेंग्यूचे ३३ संशयित रुग्णांपैकी ११ जणांचा अहवाल सकारात्मक आला आहे. तर, मलेरियाचे दोन रुग्ण आढळले आहेत. मलेरियाच्या सकारात्मक रुग्णांची एकूण संख्या २७ वर पोहोचली आहे.

**पिंपरी-चिंचवड शहरात डेंग्यूचा वाढता धोका**

- १४ दिवसांत ⊠ १२ नवीन डेंग्यू रुग्ण
- एकूण डेंग्यू रुग्णसंख्या- ३३
- मलेरिया रुग्णसंख्या- २७
- तपासणी मोहीम- ७ लाख घरांची तपासणी
- ऑगस्ट महिन्यात तापाचे रुग्ण-११,०८०
- डेंग्यू संशयित रुग्ण-३३ पैकी ११ जण डेंग्यू पॉझिटिव्ह
- आरोग्य यंत्रणा सतर्क : डेंग्यू-मलेरियावर नियंत्रणासाठी कारवाई सुरू

### डेंग्यूचे ३३, मलेरियाचे २७ रुग्ण

कीटकजन्य व जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने ६ लाख ७७ हजार २२२ घरे, ३६ लाख ४ हजार ७९१ कंटेनर, ८ हजार ४५५ भंगार दुकाने, ८ हजार १२९ बांधकाम स्थळांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी डास उत्पत्तीची पोषक वातावरण असल्याने ३ हजार ७०७ ठिकाणी नोटिस बजावण्यात आल्या.

"डेंग्यू, मलेरियाचा प्रसार रोखण्यासाठी महापालिकेकडून उपाययोजना सुरू आहेत. ज्या भागात डेंग्यूचे रुग्ण आढळले आहेत, त्या भागावर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश आरोग्य आणि वैद्यकीय विभागांना दिले आहेत. नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा."

**-विजयकुमार खोराटे,** अतिरिक्त आयुक्त

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



### निष्ठेचा परिणाम फार आहे.

भगवंतावर पूर्ण निष्ठा ठेवून प्रपंचात आपले कर्तव्य केले तर आम्हाला केव्हाही दु:ख करण्याची वेळ येणार नाही. आमच्याकडे आठवड्याचा बाजार असतो. एक नवरा-बायको असे बाजाराला गेले होते. संध्याकाळ झाली. त्यांचे घर फार लांब होते. ती दोघे आपसात बोलत होती की, “ आता उशीर झाला आहे, रात्रीचे जाणे नको. तेव्हा आज इथेच राहू आणि सकाळी जाऊ. ” त्यांचे बोलणे दोन लबाड माणसांनी ऐकले. ते त्यांना म्हणाले, “ तुम्ही का घाबरता ? आम्ही बरोबर आहोत ना ! आम्हाला तुमच्या पुढच्या गावाला जायचे आहे. आम्ही रामासाक्ष सांगतो आहो; तेव्हा आपण जाऊ या. ” या नवराबायकोला ती माणसे वाईट आहेत असे वाटले नाही. पुढे एका दरीत गेल्यावर, त्या लोकांनी त्या बाईच्या नवऱ्याला झाडाला बांधले आणि त्या बाईच्या अंगावरचे दागिने काढून घेतले. पुढे त्या बाईच्या पदराला हात लावताच ती बाई रामाचा धावा करून म्हणाली, “ रामा ! मी या लोकांच्या विश्वासावर आले नाही, त्यांनी तुझी साक्ष ठेवली, तुझी शपथ वाहिली, त्या शपथेच्या विश्वासावर मी आले. माझे रक्षण करणारा आता तूच आहेस !” एवढ्यात बंदुकीचे आवाज झाले, आणि दोन शिपाई तिथे धावत आले. तेव्हा चोर पळून गेले आणि त्या शिपायांनी त्यांना मुक्त केले, त्यांचे दागिने आणि सामान त्यांना दिले, आणि त्यांना घरी पोहोचवले. घरी गेल्यावर ती बाई म्हणाली, “ तसे जाऊ नका, थोडे गूळपाणी घेऊन जा. ” ते म्हणाले, “ नको, आम्हाला फार कामे आहेत. ” ती म्हणाली, “ थांबा जरा, मी आत्ता आणतेच. ” म्हणून ती आत वळली, तेवढ्यात ते गुप्त झाले. निष्ठा ही अशी पाहिजे. आजवर कितीकांच्यावर किती बिकट प्रसंग आले असतील, परंतु त्यांच्या निष्ठेमुळेच ते त्यातून पार पडले. सगुणभक्तीचा जर काही मोठा फायदा असेल तर तो हा की, जेव्हा आपण रामाच्या पायावर डोके ठेवतो तेव्हा आपल्या भावना उचंबळून येतात. अशा वेळी आपण रामाला सांगावे, “ रामा, आता तुझ्याशिवाय मला कोणी नाही. मला तू आपलासा करून घे. मी अवगुणी असेन, पण तू माझा अव्हेर करू नकोस, मी तुला शरण आलो आहे. ” आपल्या स्वभावामध्ये भगवंताच्या श्रद्धेपासून उत्पन्न झालेला धिमेपणा म्हणजे धीर पाहिजे. जो भगवंतावर निष्ठा ठेवील त्याच्यावर साऱ्या जगाची निष्ठा बसेल, लोक देवालासुद्धा बाजूला करतात आणि अशा निष्ठावान् मनुष्याला भजतात. निष्ठेचा परिणाम फार आहे. बोधवचन:- भगवंतावर पूर्ण निष्ठा ठेवून प्रपंच करा, तो खात्रीने सुखाचा होईल.

# नो मोदी, व्हाय मोदी, मोदी नकोत, मोदी विरोधकांचा वाढता आलेख !



‘स्टेट’मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**गेली आठ दहा वर्षे संपूर्ण जगात ‘मोदी मोदी’ चे नारे लागलेले पाहिले. आणि गेल्या काही दिवसात मोदी विरोधकांचा जोर चांगलाच वाढला असून त्याचा आलेख वरच्या दिशेनेच निघाला आहे. नो मोदी, व्हाय मोदी, नकोच.. चा सूर सध्या आळवला जात आहे, हे सत्य स्वीकारणं महत्त्वाचं आहे !**



### संपूर्ण जगच नाराज ?

मोदी ? मोदी ?? मोदी ???.. संपूर्ण जग मोदीजींवर नाराज आहे...जर तिसरे महायुद्ध झाले तर सर्व खापर मोदी यांच्या डोक्यावर फोडायला जग तयार आहे. फक्त राहुल गांधीच नाराज नाहीत. तर, अमेरिका, चीन, पाकिस्तान, पॅलेस्टाईन, जस्टिन ट्रुडो, जॉर्ज सोरोस, हमास, आयएसआय, खलिस्तानी, सगळीकडील दहशतवादी नाराज आहेत. ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, लालूप्रसाद यादव, मल्लिकार्जुन खर्गे, उद्धव ठाकरे, अरविंद केजरीवाल फारुख अब्दुल्ला.. झाडून सगळे विरोधी नेते नाराज आहेत ! यादी खूप मोठी आहे, ती वाढतच राहणार आहे !

### आणखी कोण कोण नाराज ?

महाराजांच्या या यादीत आणखी कोण कोण, ते पाहू या..दोन कोटी रुपयांचा कोबी आपल्या बंगल्याच्या बाल्कनीच्या कुंडीत पिकवणारे होनहार शेतकरीही नाराज आहेत. एकरी शंभर कोटींची वांगी पिकविणाऱ्या बारामतीच्याताई नाराज आहेत ! आता तेच गरीब बिचारे होतकरू शेतकरी काजू आणि पिस्ता खाऊन दिल्लीत रस्त्यावर निषेध करत आहेत, ते पण पाहणे महत्त्वाचे आहे !

### राहुल आणि वाड्रा फारच नाराज..

एवढंच काय, राहुल यांचा थायलंड दौरा थांबला, त्यांच्या भाऊजींचा जमिनीचा व्यवसाय थांबला, माताजींचा गुप्त वैद्यकीय दौरा थांबला, सैफई महोत्सव थांबला, लंडनहून गाडी आणणारा थांबला, पाकीट पत्रकारांच्या फाईव्ह स्टार पार्ट्या आणि फुकटचे विदेश दौरे थांबले, मध्यस्थी करणाऱ्यांचा ‘गाळा’ थांबला..बाप रे, बाप रे!

### दगडफेकवाल्यांचा धंदा बसला..

जवानांवर दगडफेक करणारे लोक प्रचंड काळजीत आहेत. पूर्वी, त्यांना दगडफेक करण्यासाठी ५०० रुपये मिळत असत. आता त्यांना बंदुकीच्या गोळ्यांचा सामना करावा लागतो आहे ! पूर्वी, पाकचे दहशतवादी काश्मीरमध्ये सहज येत असत, एकदा ते थेट मुंबईपर्यंत ही आले होते, आणि हैदोस घालून गेलेहोते ! आता परिस्थिती अशी आहे, की एकतर दहशतवादी स्वतःच अज्ञात लोकांचे लक्ष्य आहेत किंवा भारतीय सैन्य त्यांना त्यांच्या घरातच कंठस्नान घालत आहेत. आज त्या दहशतवाद्यांना आणि त्यांना आदेश देणाऱ्या म्होरक्यांना स्वतःचे घर सोडण्यापूर्वी हजारदा विचार करावा लागतो आहे, ते नक्कीच मोदींवर नाराज असणार !

### परदेशी पुरस्कार तर किती ?

जवाहरलाल नेहरूंनी स्वतःच्या हातांनी त्यांच्या स्वतःच्या गळ्यात ‘भारतरत्न’ पदक घालून स्वतःचा सन्मान केला होता, त्यांना खात्री असावी, की त्यांना नंतर हा सन्मान मिळणार नाही! पण, मोदींना आतापर्यंत २५ पेक्षा जास्त परदेशी “सर्वोच्च नागरी सन्मान” मिळाले आहेत. आपल्या तर करण्याबाहेरचे आहे की मोदींमध्ये सर्वांना काय विशेष दिसते ते ?

### नोटाबंदी भारतात, जाळ पाकिस्तानात..

मोदी यांनी एक अतिशय धाडसी निर्णय घेतला, भारतात नोटाबंदी करून! आणि तिकडे पाकमध्ये पीठ मीठ ही सहजतेने मिळते दुरापास्त झाले. काही गुलाम मानसिकतेच्या भारतीयांना नोटाबंदी समजली नसेल, पण पाकिस्तानला ते चांगले समजले! त्यामुळे, आता त्यांच्यासाठी दहशतवाद्यांना पगार देणे देखील एक ओझे बनले आहे.

### एक गोष्ट समजण्यापलीकडे.

भारतातील मुस्लिमांना मोदी अजिबात आवडत नाहीत, पण पाकिस्तानी मुस्लिम मात्र म्हणतात की, आम्हाला मोदीसारखा नेता पाहिजे होता !पाकिस्तानी जनतेचा असा ठाम विश्वास आहे, की मोदींनी हिंदूंसाठी खूप काही केले आहे. पण,येथील हिंदू म्हणतात की मोदींनी आमच्यासाठी काहीही केले नाही, वस्तुस्थिती तुम्हीच ओळखा !

### कोणावर विश्वास ठेवावा ?

स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे, आपल्याच देशात, आपलेच आराध्य आणि आदर्श प्रभू श्रीराम ज्यांच्या रामराज्याच्या संकल्पनेवर आपले संविधान आधारित आहे, अशा देवाचे मंदिर नव्हते,तेही बांधले गेले आणि ते उभारण्याचे सौभाग्य मोदींच्या हाती आले होते, त्यामुळे अनेकांना त्याचा हेवा वाटणे, स्वाभाविक आहे! नवीन संसद भवन त्यांच्याच कार्यकाळात बांधले गेले. सोबतच सेंट्रल विस्टा प्रोजेक्ट मुळे सर्व सचिवालये उभारली गेली. जे भाड्याच्या जागेत भाड्याने चालत होते, ते पण आता आपल्या हक्काच्या स्वतःच्या जागेत स्थलांतरीत होत आहेत. त्यामुळे काही लोकांना फुकटचे मलीदे मिळने बंद झाले आहे, त्यांचाही मोदी द्वेष दिवसेंदिवस आणखी वाढत आहे. तो इतका वाढला की विरोधकांनी संसद भवनाच्या प्रवेश समारंभावर बहिष्कार टाकला होता, हे आठवत असेलच!

### काश्मीर प्रश्न सुटला..

सर्वांना असे वाटत होते की काश्मीरमधून कलम ३७० कधीही हटवता येणार नाही. फारुख उघडपणे म्हणायचे, जर ३७० ला स्पर्श केला तर भारतीय ध्वज फडकवण्यासाठी हात उरणार नाहीत. पण, ध्वज देखील फडकवण्यात आला आणि ध्वज फडकवण्यासाठी हातही सापडले. पाकिस्तान घाबरलेल्या स्थितीत होता, संयुक्त राष्ट्रेही काहीही करू शकली नाहीत, ही किमया साधणाऱ्या मोदींचा म्हणूनच द्वेष केला जात आहे.

### तिहेरी तलाक ची परंपरा..

सुमारे, १४०० वर्षे जुनी तिहेरी तलाकची प्रथा- परंपरा कायद्याद्वारे रद्द करण्यात आली ! मुस्लिम महिला खूप आनंदी होतील आणि मोदींना भरपूर मते मिळतील असे वाटले होते, पण नाही..राहुल यांनी दर महिना ८५०० रुपयांचे खोटे आमिष दाखवले..कॉँग्रेस ७० वर्षांपासून या विशिष्ट समुदायाला कसे मूर्ख बनवत आहे ती..कॉँग्रेस काहीही न देताही हे काम करू शकते. शेवटी, एक गोष्ट सांगावी वाटते ती म्हणजे, मोदींची देशभक्ती अतुलनीय आहे..ज्या ज्या लोकांना किंवा राजकीय पक्षांना देशाचे भले पाहवत नाही, तेच मोदींचा द्वेष करतात.. खुशाल करा, भारताची विकासाची उत्तुंग झेप अशीच राहणार आहे, अगदी मोदींना हवी त्याप्रमाणे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## ठाकरे यांना टोला
## राधाकृष्ण विखे यांचा बाळासाहेब थोरात यांना प्रश्न

# मतदार बोगस वाटायला लागले का?

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बोगस आणि खोटे मतदार संबोधून त्यांच्याच तालुक्यातील मतदारांचा अपमान ते करीत आहेत. पराभव झाल्यामुळे आता चाळीस वर्षांनंतर तुम्हाला मतदार बोगस वाटायला लागले का ? असा प्रश्न पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे नाव न घेता उपस्थित केला आहे.**

## जनतेनेच विधानसभेला उत्तर दिले



लोणी येथे माध्यमांशी बोलतांना विखे म्हणाले की, निवडणूक आयोगाकडून मतदार याद्या जाहीर झाल्यानंतर त्यावर हरकती घेण्यासाठी मुदत दिली जाते. मात्र, आज आयोगावर आरोप करणारे तेव्हा झोपले होते का ?, पराभव झाला म्हणून थेट मतदारांनाच बोगस आणि खोटे ठरविण्याचा प्रयत्न म्हणजे एकप्रकारे त्यांचा अपमान आहे. मग तुम्हाला निवडून देतानाही बोगस मतदान होते का? कोणत्याही निवडणुकीचा निकाल खुल्या मनाने स्वीकारला पाहिजे. निळवंडे धरणाच्या संदर्भात थोरातांनी केलेल्या टिकेला उत्तर देण्याची आवश्यकता नाही. जनतेनेच त्यांना विधानसभेला उत्तर दिले आहे. त्यांनीच आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचा टोला विखे यांनी लगावला. वसंतदादा शुगरच्या संदर्भात केलेल्या वक्तव्याचा माध्यमांकडून विपर्यास केला गेला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल माझे वक्तव्य नव्हते. त्यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य करण्याचा प्रश्नच नाही. तसे माझ्याकडून कधीही झालेले नाही, असे स्पष्ट करून विखे म्हणाले, अनेक वर्ष देशात कृषिमंत्री पदावर राहूनही ज्यांना सहकारी कारखानदारी बाबत कोणतेही निर्णय करता आले नाहीत, अशा जाणत्या राजांना जाणीव करून देण्यासाठी मी बोललो. कारण एकीकडे सरकारच्या मदतीची अपेक्षा ठेवायची पण वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या अहवालात केंद्र सरकारच्या अभिनंदनाचा ठराव करण्याचे मोठे मन दाखवायचे नाही. याबाबतची वस्तूस्थिती मी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या साक्षीने व्हीएसआयच्या शिष्टमंडळाला करून दिली होती आणि तोच संदर्भ माझ्या भाषणात होता. सहकारी साखर कारखान्याच्या संदर्भात आयकराचा बोजा कमी करण्याचा किंवा इथेनॉल धोरणाचा निर्णय करून राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना दिलासा देण्याचे मोठे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या माध्यमातून झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेही यासाठी मोठे सहकार्य मिळाले. अनेक वर्ष राज्यातील जाणते राजे फक्त केंद्राकडे शिष्टमंडळ घेवून जात होते, पण कोणताही निर्णय त्यांना करता आला नाही, अशी टीका विखे यांनी शरद पवार यांचे नाव न घेता त्यांच्यावर केली. लोणी येथे माध्यमांशी बोलतांना विखे म्हणाले की, निवडणूक आयोगाकडून मतदार याद्या जाहीर झाल्यानंतर त्यावर हरकती घेण्यासाठी मुदत दिली जाते. मात्र, आज आयोगावर आरोप करणारे तेव्हा झोपले होते का ?, पराभव झाला म्हणून थेट मतदारांनाच बोगस आणि खोटे ठरविण्याचा प्रयत्न म्हणजे एकप्रकारे त्यांचा अपमान आहे. मग तुम्हाला निवडून देतानाही बोगस मतदान होते का? कोणत्याही निवडणुकीचा निकाल खुल्या मनाने स्वीकारला पाहिजे. निळवंडे धरणाच्या संदर्भात थोरातांनी केलेल्या टिकेला उत्तर देण्याची आवश्यकता नाही. जनतेनेच त्यांना विधानसभेला उत्तर दिले आहे. त्यांनीच आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचा टोला विखे यांनी लगावला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल माझे वक्तव्य नव्हते. त्यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य करण्याचा प्रश्नच नाही. तसे माझ्याकडून कधीही झालेले नाही, असे स्पष्ट करून विखे म्हणाले, अनेक वर्ष देशात कृषिमंत्री पदावर राहूनही ज्यांना सहकारी कारखानदारी बाबत कोणतेही निर्णय करता आले नाहीत.

### आत्मपरीक्षण करण्याची गरज

कारण एकीकडे सरकारच्या मदतीची अपेक्षा ठेवायची पण वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या अहवालात केंद्र सरकारच्या अभिनंदनाचा ठराव करण्याचे मोठे मन दाखवायचे नाही. याबाबतची वस्तूस्थिती मी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या साक्षीने व्हीएसआयच्या शिष्टमंडळाला करून दिली होती आणि तोच संदर्भ माझ्या भाषणात होता.

# ५ हजार कोटींचा घोटाळा उघडकीस

## महायुती सरकारबाबत रोहित पवार उद्या मोठा गौप्यस्फोट करणार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा आमदार रोहित पवार हे सातत्याने महायुती सरकारवर जोरदार टीका करत आहेत. दरम्यान आता महायुती सरकारमधील पाच हजार कोटींचा घोटाळा उघडकीस आणणार असल्याचा इशारा आमदार रोहित पवार यांनी दिला आहे. या संदर्भातील माहिती रोहित पवार यांनी एक्सवर (ट्विटर) पोस्ट करत दिली आहे.**



तसेच सोमवारी (१८ ऑगस्ट) पत्रकार परिषदेत ५ हजार कोटींच्या घोटाळ्याचा पर्दाफाश करणार असल्याचं रोहित पवार यांनी म्हटलं आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे."मातृभूमीशी गद्दारी करुन इंग्रजांना मदत करणाऱ्या कुटुंबाच्या वारसदारांच्या घशात ५ हजार कोटींचा मलिदा... वर्तमानातील गद्दारांची इतिहासातल्या गद्दारांशी हातमिळवणी.'गँज ऑफ गद्दार'चा पर्दाफाश करण्यासाठी भेटू उद्या (सोमवार) पत्रकार परिषदेत... सकाळी ९.३० वाजता. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष कार्यालय बॅलार्ड इस्टेट, मुंबई", असं रोहित पवार यांनी म्हटलं आहे. दरम्यान, आमदार रोहित पवारांनी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा रमी खेळतानाचा व्हिडीओ समोर आणला होता. मंत्री माणिकराव कोकाटे यांचा रमी खेळतानाचा व्हिडीओ ट्विट करत रोहित पवारांनी महायुती सरकारवर जोरदार टीका केली होती. त्यानंतर विरोधकांनी माणिकराव कोकाटे यांच्यावर टिकेची झोड उठवली होती. त्यानंतर अखेर माणिकराव कोकाटे यांच्याकडून कृषीमंत्रिपद काढून घेण्यात आलं आणि कृषी मंत्रिपदाची जबाबदारी दत्तात्रय भरणे यांच्याकडे देण्यात आली तर माणिकराव कोकाटे यांच्याकडे क्रीडा मंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आलेली आहे.

### दोन्ही पवार एकत्र आले होते

उपमुख्यमंत्री अजित पवारांचे पुतणे आमदार रोहित पवार यांनी त्यांच्यासमोरच विधान केलं होतं. सांगलीतील इस्लामपूर येथे महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या प्रा. डॉ. एन. डी. पाटील विधी महाविद्यालय, श्रीमती सरोज नारायण पाटील मानसशास्त्र संशोधन केंद्र आणि प्रा. डॉ. एन. डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहाचा उद्घाटन सोहळ्याच्या कार्यक्रमानिमित्त दोन्ही पवार एकत्र आले होते.

बिहार निवडणूक

## काँग्रेसच्या ‘व्होटर अधिकार यात्रे’ला सुरुवात

# निवडणुकीसाठी विरोधकांचे रणशिंग!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मदतीने भाजपने देशभरात निवडणुकांचे घोटाळे केले असून या ‘मतचोरां’ना केंद्र आणि बिहारच्या सत्तेतून खाली खेचा, असे आवाहन काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यासह ‘महागठबंधन’च्या नेत्यांनी रविवारी केले. काँग्रेसच्या ‘व्होटर अधिकार यात्रे’ला सुरुवात करताना सासाराम येथील जाहीर सभेतून विरोधकांनी सत्ताधारी भाजप-संयुक्त जनता दल आघाडीविरोधात रणशिंग फुंकले.**

### मत चोरीच्या आरोपाविरोधात स्पष्टीकरण



एकीकडे केंद्रीय निवडणूक आयोग नवी दिल्लीमध्ये राहुल गांधींनी केलेल्या मतांच्या चोरीच्या आरोपाविरोधात स्पष्टीकरण देत असतानाच, रविवारी विरोधकांनी आयोग व भाजपवर हल्लाबोल केला. सभेला गांधी यांच्यासह राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यादव, बिहारचे विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव आणि ‘महागठबंधन’मधील सर्व घटक पक्षांचे नेते सहभागी झाले.सभेतून भाजपच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीविरोधात जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले. ‘बिहारमधून चोरांना हटवा, भाजपला हरवा’, असा नारा लालूप्रसाद यांनी दिला. “बिहारमधील निवडणूक भाजप विरोधात एकजुटीने लढवली पाहिजे. त्यासाठी राहुल आणि तेजस्वी यांच्या पाठीशी उभे राहा. देशातील लोकशाही टिकवण्यासाठी भाजपला सत्तेतून फेकून द्या,” असे आवाहन त्यांनी केले.बिहार निवडणुकीमध्ये काँग्रेसकडून मतचोरी व संविधान बचाओ या दोन मुद्द्यांना प्रचारात प्राधान्य दिले जाईल, हे राहुल गांधींच्या भाषणातून स्पष्ट झाले. महाराष्ट्र, कर्नाटकमध्ये केंद्रीय निवडणूक आयोगाने मतांची चोरी केली. बनावट मतदारांचा समावेश केला गेला, या नव्या मतदारांच्या मदतीने भाजपने जागा जिंकल्या, असा आरोप राहुल गांधींनी केला. बिहारमध्ये निवडणूक आयोग मतदारांची फेरतपासणी करून विधानसभा निवडणुकीची चोरी करत असल्याची टीका त्यांनी केली. बिहारची निवडणूक ही संविधान बचावासाठी होणारी लढाई आहे.राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजप संविधान नष्ट करत आहेत, असा आरोप गांधींनी केला. तर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल केला. “पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून संघाचे कौतुक केले. संघ जगातील सर्वांत मोठी स्वयंसेवी संस्था असल्याचे मोदी म्हणाले. जे ब्रिटिशांकडे नोकरी मागत होते, ज्यांनी कधी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला नाही, त्यांचे कौतुक केले जात आहे. संघ, मोदी हे देशासाठी अत्यंत धोकादायक आहेत, त्यांना सत्तेवरून खाली खेचा,” अशा शब्दांत खरगेंनी प्रहार केला. तेजस्वी यादव यांनीही भाजपवर टीका करताना केंद्रीय निवडणूक आयोग मतांची चोरी नव्हे तर मतांचा दरोडा टाकत आहे, असा आरोप केला. मताचा अधिकार हा मागास, गोरगरिबांचे अधिकार असून तो हिरावून घेतला जात आहे. लोकशाही संपवण्याचा घाट घातला जात असून महागठबंधन हे होऊ देणार नाही, ही ताकद फक्त बिहारमध्ये आहे, असे ते म्हणाले. काँग्रेसची ही ‘व्होटर अधिकार यात्रा’ १६ दिवस चालणार असून २३ जिल्ह्यांतील ५०हून अधिक विधानसभा मतदारसंघांतून ती प्रवास करेल. रविवारी पहिल्या दिवशी औरंगाबादमध्येही जाहीर सभा झाली.राजदचे प्रमुख लालूप्रसाद आजारी असतानाही सभेला उपस्थित राहिले. अवघ्या ३-४ मिनिटांच्या भाषणात त्यांनी सभेचा नूर पालटून टाकला. “लागल लागल झुलनिया में धक्का, बलम कलकत्ता चलन....” या त्यांच्या ओळीवर अनेक मिनिटे टाळ्यांचा कडकडाट झाला. या ओळीचा मथितार्थ असा की, भाजप आणि जेडीयूला असा धक्का द्या, की ते पुन्हा कधीच सत्तेवर येता कामा नयेत!बिहारमधील गरीब, कमजोर, मागास, अल्पसंख्याक लोकांची नावे मतदार यादीतून काढली जात आहेत. नवे मतदार समाविष्ट केले जात आहेत. महाराष्ट्र, कर्नाटकप्रमाणे बिहारमधील निवडणूक चोरली जाईल पण आम्ही ही चोरी रोखू.

### सर्व घटक पक्षांचे नेते सहभागी

एकीकडे केंद्रीय निवडणूक आयोग नवी दिल्लीमध्ये राहुल गांधींनी केलेल्या मतांच्या चोरीच्या आरोपाविरोधात स्पष्टीकरण देत असतानाच, रविवारी विरोधकांनी आयोग व भाजपवर हल्लाबोल केला. सभेला गांधी यांच्यासह राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालूप्रसाद यादव, बिहारचे विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव आणि ‘महागठबंधन’मधील सर्व घटक पक्षांचे नेते सहभागी झाले.

# सत्तेत असताना अन्याय्यी कायदे!

## उत्तर प्रदेशात मिळालेले यश विरोधी पक्षांना पचवता येत नाही

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संविधानाचा आदर करत असल्याचे दाखवणारे सत्तेत असताना अन्याय्य कायदे करत होते, अशा शब्दांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांच्यावर नाव न घेता जोरदार शाब्दिक हल्ला चढवला. पंतप्रधान मोदी दिल्लीमध्ये दोन महामार्गांचे उद्घाटन केल्यानंतर आयोजित कार्यक्रमात भाषण करत होते.**



विरोधकांवर टीका करताना मोदी म्हणाले, “पूर्वीची सरकारे दिल्लीतील सफाई कर्मचाऱ्यांना गुलामाप्रमाणे वागवत. कोणी पूर्वसूचना न देता कामावर आले नाही तर त्यांना एक महिना तुरुंगात ठेवण्याची दिल्ली महापालिका कायद्यामध्ये तरतूद होती. आज सामाजिक न्यायाबद्दल मोठमोठी वक्तव्ये करणाऱ्या विरोधी पक्षांनी देशात असे अनेक नियम आणि कायदे राबवले,” असे मोदी यांनी सांगितले. आपले सरकार असे प्रतिगामी कायदे शोधून ते रद्द करत आहे, असे शेकडो कायदे आम्ही रद्द केले आहेत आणि ही प्रक्रिया सुरू आहे असे पंतप्रधान म्हणाले. भाजपला दिल्ली, हरियाणा, राजस्थान आणि उत्तर प्रदेशात मिळालेले यश विरोधी पक्षांना पचवता येत नाही अशी टीकाही मोदी यांनी केली. हे पक्ष जनतेचा विश्वास आणि वास्तव यापासून दूर आहेत.

असे ते म्हणाले.जे लोक डोक्यावर संविधानाची प्रत घेऊन नाचत आहेत, त्यांनी सत्तेत असताना अन्याय्य आणि प्रतिगामी कायदे करून संविधान पायदळी तुडवले. या लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भावनेला धोका दिलापंतप्रधान मोदी यांनी द्वारका द्रुतगती मार्गाचा दिल्ली भाग आणि शहर विस्तार मार्ग-२च्याच अलिपूर ते दिचाव कलान या दोन महामार्गांचे रविवारी उद्घाटन केले.

### लाखो टन कचऱ्याचा पुनर्वापर

दिल्ली आणि सभोवातलच्या प्रदेशातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हे महामार्ग बांधण्यात आले आहेत. या बांधकामांमध्ये लाखो टन कचऱ्याचा पुनर्वापर करण्यात आल्याचे मोदी यांनी यावेळी सांगितले. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग नितीन गडकरी, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी हेही यावेळी उपस्थित होते.

# माझी आई माझे पैसे



बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. अभिनेत्री नुकतीच ‘स्काय फोर्स’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. स्काय फोर्समधील तिच्या भूमिकेचे मोठे कौतुकदेखील होताना दिसले.बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. अभिनेत्री नुकतीच ‘स्काय फोर्स’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. स्काय फोर्समधील तिच्या भूमिकेचे मोठे कौतुकदेखील होताना दिसले.सारा अली खानने नुकताच टाइम्स नाऊ समिट २०२५ मध्ये हजेरी लावली होती. यावेळी आर्थिक गुंतवणूकीबाबत सारा अली खान म्हणाली, “माझी आई माझे पैसे हाताळते. अगदी माझे जी पे(GPAY) अकाउंटदेखील तिच्या अकाउंटबरोबर जोडलेले आहे, माझा ओटीपी नंबर तिच्या मोबाईलवर येतात.”शाळेत असताना जसा इतरांना पॉकेट मनी मिळतो. तसा तुला आता पॉकटे मनी मिळतो का? यावर सारा म्हणाली, “पॉकेट मनी विसरा, मी तिला विचारल्याशिवाय तिकीटदेखील बुक करू शकत नाही.” पुढे ती आर्थिक कुठे गुंतवणूक करते असे विचारले असता अभिनेत्री म्हणाली, “रिअल इस्टेट, शेअर बाजार, सोन्याचे बाँडमध्ये गुंतवणूक करत असल्याचा खुलासा केला. सारा अली खान अमृता सिंग व सैफ अली खान यांची मुलगी आहे. सैफ अली खान व अमृता सिंगने १९९१ मध्ये लग्नगाठ बांधली होती. मात्र, २००४ मध्ये त्यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला. त्यांना सारासह इब्राहिम अली खान हा मुलगादेखील आहे. त्यानंतर सैफ अली खानने करीना कपूरशी २०१२ मध्ये लग्नगाठ बांधली. त्यांना तैमूर व जेह ही मुले आहेत. सैफने दुसरे लग्न केले असले तरी त्याचे सारा व इब्राहिमबरोबर उत्तम नाते असल्याचे पाहायला मिळते. अनेक सण-उत्सव ते एकत्र साजरे करतात. सारा, इब्राहिम, जेह व तैमूर यांच्यातील बॉण्डिंगदेखील लक्ष वेधून घेताना दिसते.जानेवारी महिन्यात सैफ अली खानवर एका अज्ञात व्यक्तीने घरात घुसून चाकू हल्ला केला होता. त्यावेळी हे कुटुंब मोठ्या चर्चेत आले होते. करीना कपूर, शर्मीला टागोर यांच्यासह सारा-इब्राहिमदेखील चिंतेत असल्याचे दिसले होते. आता हे कुटुंब त्यांच्या सुरक्षेची काळजी घेताना दिसते. बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. अभिनेत्री नुकतीच ‘स्काय फोर्स’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. स्काय फोर्समधील तिच्या भूमिकेचे मोठे कौतुकदेखील होताना दिसले. बॉलीवूड अभिनेत्री सारा अली खान ही तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत असते. अभिनेत्री नुकतीच ‘स्काय फोर्स’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. स्काय फोर्समधील तिच्या भूमिकेचे मोठे कौतुकदेखील होताना दिसले.

# आमिषाचा खुलासा



सध्या मनोरंजन विश्वात दोन सिनेमे धुमाकूळ घातला आहे. त्यात एक आहे 'गदर2' आणि दुसरा आहे 'OMG2'. गदर2 च्या माध्यमातुन सनी देओल आणि आमिषा पटेल यांनी बऱ्याच वर्षांनंतर मोठ्या पडद्यावर एंट्री केली आहे. दोघांची जोडी देखील प्रेक्षकांना खुप आवडत आहे. दरम्यान अमिषाने या चित्रपटाला मिळालेल्या यशानंतर अनेक मुलाखती दिल्या आहेत. याच एका मुलाखतीत तिने तिच्या फ्लॉप चित्रपटाबाबत सलमान खानला जबाबदार धरले आहे. तब्बल दोन दशकांनंतर आमिषाचा गदर 2 चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला आहे. अमीषाने तिच्या करिअरच्या सुरुवातीला दोन सुपरहिट चित्रपट दिले, पण नंतर तिच्यावर फ्लॉप चित्रपटांचा शिक्का लागला. दरम्यान ती एका मुलाखतीत तिच्या 2002 मध्ये प्रदर्शित झालेल्या तिच्या 'ये है जलवा' या फ्लॉप चित्रपटाबद्दल बोलली. या चित्रपटात तिच्या सोबत बॉलिवूडचा सुपरस्टार सलमान खान हा मुख्य भूमिकेत होता. या चित्रपटाची स्टोरी जरी चांगली असली तरी हा सिनेमा काही खास कमाल करु शकला नाही. याबद्दल बोलतांना अमीषा पटेल म्हणाली की, डेव्हिड धवनच्या दिग्दर्शनात झालेल्या या चित्रपटात सर्व काही हिट झालं होतं मात्र त्यावेळी सलमान खानच्या 'हिट-अँड-रन' प्रकरणाच्या मीडिया कव्हरेजने या चित्रपटाच्या कामगिरीवर वाईट परिणाम झाला आणि चित्रपट खराब झाला. अमीषा म्हणते, "ये है जलवा हा डेव्हिड धवनच्या सर्वोत्कृष्ट चित्रपटांपैकी एक होता. सलमान खुपच देखणा दिसत होता. चित्रपटाचे संगीत आणि सर्व काही चांगले होते.

# अक्षय -रवीनाची जोडी एकत्र?

बॉलिवूडचा खिलाडी कुमार म्हणजेच अक्षय कुमार हा सध्या त्याच्या OMG2 या चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्याचा हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहेत. अक्षयच्या गेल्या काही चित्रपटांकडे पाहिलं तर त्याचे सलग सहा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाले होते मात्र OMG2 ने आता अक्षयच्या फ्लॉप सिनेमांवर फुल स्टॉप लावला आहे. सध्या अक्षय कुमार त्याच्या सिनेमातील अभिनेत्रीच्या नावामुळे चर्चेत असते. आता अक्षयच्या पुढच्या चित्रपटात त्याची एक्स गर्लफ्रेंड रवीना टंडन सोबत दिसणार असल्याचं बोललं जात आहे. बॉलिवूडमध्ये असा एक काळ होता ज्यावेळी अक्षय कुमार आणि रवीना टंडन यांची जोडी बॉक्स ऑफिसवर सुपरहिट होती. अनेक सिनेमांमध्ये त्यांनी एकत्र काम केले होते. ही जोडी बॉलिवूडमधील सर्वात हिट जोडीपैकी एक आहे. यासोबतच दोघांनीही एकमेकांना बराच काळ डेट केले होते. मात्र काही काळानंतर दोघेही वेगळे झाले. त्याचे प्रेम प्रकरण आणि ब्रेकअप आणि नंतर दुसऱ्याशी लग्न झाल्यानंतर दोघांची जोडी पुन्हा मोठ्या पडद्यावर पाहायला मिळाली नाही. त्याचे चाहते या जोडीला खुप मिस करत होते. त्यांना एकत्र पाहण्यासाठी चाहते अजूनही उत्सुक आहेत. आता तब्बल 19 वर्षांनंतर पुन्हा एकदा ही जोडी प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. मीडियाने दिलेल्या वृत्तानुसार, अक्षय कुमार आणि रवीना टंडन आता 'वेलकम 3'मध्ये एकत्र काम करणार आहेत. 'वेलकम टू द जंगल'मध्ये ही जोडी प्रेक्षकांचे मनोरंजन करणार आहेत.




# त्या व्हिडिओनं नेटकरी हँग!



उर्फी जावेद ही नेहमीच तिच्या वेगवेगळ्या अतरंगी फॅशनमुळे चर्चेत असणारी सेलिब्रेटी आहे. त्यावरुन उर्फीला अनेकांनी साम, दाम, दंड आणि भेद याप्रकारे समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा तिच्यावर काहीही परिणाम झालेला नाही. आता उर्फीच्या हटके फॅशनचा एक व्हिडिओ समोर आला आहे. त्यात तिनं जी वेशभूषा केली आहे त्यावरुन तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. अनेकांनी उर्फीवर नेहमीप्रमाणे जोरदार टीका केली आहे. काहींनी तर उर्फीच्या हटके स्टाईलवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. एवढी भारी आयडिया उर्फीला सुचते तरी कशी, असा प्रश्न तिला नेटकऱ्यांनी विचारला आहे. यापूर्वी उर्फीनं वेगवेगळ्या वस्तूंचा वापर करुन तिची फॅशनची हौस पूर्ण केली आहे. घरातील ग्लास, भांडी, मोबाईल फोन आणि चक्क कंगव्याचा ड्रेस उर्फीनं परिधान करुन आपण किती क्रिएटिव्ह आहोत याचा परिचय करुन दिला आहे. तिचा तो अंदाज सोशल मीडियावर नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. उर्फीनं तो व्हिडिओ शेयर केल्यानंतर त्यावर आलेल्या प्रतिक्रिया भन्नाट आहेत. एकानं लिहिलं आहे की, मी घरातील माझा कंगवा शोधत होतो. जेव्हा उर्फीचा व्हिडिओ पाहिला तेव्हा मात्र मला धक्काच बसला. उर्फी माझा कंगवा घेऊन गेली. आता काय बोलावं. दुसऱ्या युझर्सनं म्हटले की, उर्फी घरात तर पूर्ण कपड्यात असते. घराबाहेर पडल्यावर ती अशी का वागते हे कळत नाही. तिसऱ्या युझर्सनं लिहिलं आहे, बस किंवा ट्रेनमध्ये काहीजण कंगवा विकण्यासाठी येतात हे आम्हाला माहिती होतं. पण आता उर्फी देखील हा नवा बिझनेस करु लागली आहे की काय, असा प्रश्न तिचा तो व्हिडिओ पाहिल्यावर पडतो. एवढी कल्पनाशक्ती येते कुठून, असे प्रश्न तिला नेटकऱ्यांनी विचारले आहेत.

# शो संपताच श्रेयस तळपदे भावुक

झी मराठीवरील लोकप्रिय रिॲलिटी शो ‘चल भावा सिटीत’चा महाअंतिम सोहळा रविवारी (१ जून) रोजी दिमाखात पार पडला. या पहिल्या पर्वाच्या अंतिम फेरीत पाच जोड्यांमध्ये चुरशीच्या लढत रंगली होती. शोच्या अंतिम सोहळ्यात अथर्व-रेवती, विजय-अनुश्री, ऋषिकेश-श्रुती, दिपक-प्रणाली आणि रामा-नीता या पाच जोड्या पोहोचल्या होत्या. यापैकी श्रुती राऊळ आणि ऋषिकेश चव्हाण या जोडीने बाजी मारली. या शोच्या निमित्ताने बॉलीवूडसह मराठी मनोरंजन विश्वात आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारा अभिनेता श्रेयस तळपदे छोट्या पडद्यावर पुन्हा एकदा आपली



जादू दाखवली. ‘चल भावा सिटीत’ या रिॲलिटी शोच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी श्रेयसवर होती आणि त्याने ही जबाबदारी अगदी चोखपणे पार पाडली. श्रेयसने आधी झी मराठीवरीलच ‘माझी तुझी रेशीमगाठ’ मालिकेतून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं होतं.चल भावा सिटीत’ शोची सांगता होताच श्रेयसने सोशल मीडियावर त्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत. खास व्हिडिओ शेअर करत श्रेयस असं म्हणतो, “मित्रांनो अशाप्रकारे आपल्या ‘चल भावा सिटीत’ची सांगता होत आहे. ज्या प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिले, उत्कृष्ट प्रतिसाद दिला, न चुकता शो पाहिला. त्यांचे मी सर्व प्रथम आभार मानतो. तुमच्या प्रेमामुळे, पाठिंब्याने आम्हाला उत्तम काम करण्याची स्फूर्ती येते.”

**बुमरा सज्ज** — उपलब्धतेबाबत निवड समितीशी सकारात्मक चर्चा

# आशिया चषकासाठी बुमरा सज्ज!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**तारांकित वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराने आगामी आशिया चषक ट्वेन्टी-२० स्पर्धेसाठी आपण उपलब्ध असल्याचे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (बीसीसीआय) कळविले आहे. काही दिवसांपूर्वी बुमरा आणि निवड समिती सदस्यांमध्ये सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली.**

## बुमरा - निवड समितीमध्ये चर्चा



यंदा आशिया चषक स्पर्धा ट्वेन्टी-२० प्रारूपात संयुक्त अरब अमिराती येथे ९ ते २८ सप्टेंबर या कालावधीत रंगणार आहे. या स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा मंगळवारी (१९ ऑगस्ट) मुंबई येथे करण्यात येईल. त्यापूर्वी बुमरा आणि अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीमध्ये चर्चा झाली.‘आगामी आशिया चषक स्पर्धेसाठी आपण उपलब्ध असल्याचे बुमराने निवड समितीला कळविले आहे. निवड समिती या आठवड्यात भेटून पुढील निर्णय घेईल,” असे ‘बीसीसीआय’मधील सूत्राने सांगितले.गेल्या काही काळापासून बुमराच्या तंदुरुस्तीबाबत बरीच चर्चा केली जात आहे. नुकत्याच झालेल्या इंग्लंड दौऱ्यात कार्यभार व्यवस्थापनांतर्गत बुमरा पाचपैकी दोन कसोटी सामन्यांना मुकला. तो हेडिंग्ली येथील पहिला सामना खेळला, मग एजबॅस्टन येथील दुसऱ्या सामन्याच्या वेळी त्याने विश्रांती घेतली. त्यानंतर लॉर्ड्स येथे झालेल्या तिसऱ्या कसोटीसाठी त्याचे पुनरागमन झाले. ओल्ड ट्रॅफर्ड येथील चौथ्या कसोटीतही तो खेळला. मात्र, भारतीय संघ १-२ असा पिछाडीवर असूनही बुमराने मालिकेतील निर्णायक पाचवा सामना खेळणे टाळले. त्यामुळे त्याच्यावर बरीच टीकाही झाली.बुमराने कसोटी मालिकेदरम्यान एकूण ११९.४ षटके टाकली आणि दोन वेळा डावात पाच बळी मिळविण्याची कामगिरी केली. मात्र, तो तीन कसोटीत खेळला, त्यापैकी दोनमध्ये भारतीय संघ पराभूत झाला, तर एक कसोटी अनिर्णित राहिली. त्याच्या अनुपस्थितीत भारताने उर्वरित दोन्ही सामने जिंकताना मालिका बरोबरीत सोडवली.सध्या विश्वातील सर्वोत्तम गोलंदाज अशी ख्याती असलेल्या बुमराला कारकीर्दीदरम्यान विविध दुखापतींचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे आता त्याच्याबाबतीत अधिक खबरदारी बाळगली जात आहे. आशिया चषक स्पर्धा ट्वेन्टी-२० प्रारूपात होणार असल्याने बुमराला मोठे स्पेल टाकावे लागणार नाहीत.

## सरावासाठी लवकर ‘प्रस्थान’

मात्र, संघ व्यवस्थापनाने बंगळूरुपेक्षा थेट अमिराती येथेच सराव करण्यास पसंती दर्शवली. – “स्पर्धेपूर्वी भारतात सराब शिबीर होणार नाही. खेळाडू स्पर्धेच्या तीन-चार दिवसांपूर्वी अमिराती गाठतील. त्यामुळे त्यांना सरावासाठी वेळ मिळू शकेल,” असे सूत्राने सांगितले. आशिया चषकापूर्वी सराव सामना होणार नसल्याने खेळाडूंना नेट्समध्येच घाम गाळावा लागेल.

शिवाय, साखळी फेरीत भारताला पाकिस्तानव्यतिरिक्त ओमान आणि संयुक्त अरब अमिराती या तुलनेने दुबळ्या संघांविरुद्ध खेळायचे असल्याने गरज वाटल्यास बुमराला विश्रांतीही दिली जाऊ शकेल.भारतीय संघाने गेल्या वर्षी वेस्ट इंडिज आणि अमेरिकेत झालेल्या ट्वेन्टी-२० विश्वचषकाचे जेतेपद पटकावले होते. भारताच्या विश्वविजयात बुमराने निर्णायक भूमिका बजावली होती. त्याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कारही मिळाला होता. अंतिम लढतीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याने चार षटकांत केवळ १८ धावांच्या मोबदल्यात दोन बळी मिळवण्याची अप्रतिम कामगिरी केली होती. बुमराचा हा अखेरचा आंतरराष्ट्रीय ट्वेन्टी-२० सामना होता. आता आशिया चषकात त्याचे पुनरागमन अपेक्षित आहे. त्याने आतापर्यंत एकूण ७० आंतरराष्ट्रीय ट्वेन्टी-२० सामने खेळले असून त्यात ८९ बळी मिळवले आहेत. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत बुमराने खेळलेला अखेरचा कसोटी सामना आणि आशिया चषकाचा पहिला सामना यात जवळपास ४० दिवसांचे अंतर असेल. त्यामुळे बुमरा पूर्णपणे तंदुरुस्त आणि ताजातवाना असणे अपेक्षित आहे.आशिया चषक स्पर्धेला ९ सप्टेंबरपासून सुरुवात होईल. मात्र, परिस्थितीशी जुळवून घेता यावे आणि सरावासाठी पुरेसा वेळ मिळावा, यासाठी भारतीय संघ स्पर्धेच्या काही दिवस आधीच संयुक्त अरब अमिराती गाठेल. बंगळूरु येथे सराव शिबिराच्या आयोजनाची ‘बीसीसीआय’ने तयारी दर्शवली होती.

# बायर्न म्युनिकला जर्मन सुपर चषकाचे जेतेपद

## स्टुटगार्टवर मात; पदार्पणात लुइस डियाझचा गोल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आक्रमकपटू लुइस डियाझने पदार्पणात साकारलेल्या गोलमुळे बलाढ्य बायर्न म्युनिक संघाने स्टुटगार्टवर २-१ अशी मात करत जर्मन सुपर चषकाचे जेतेपद पटकावले. बायर्नचा अन्य गोल तारांकित आघाडीपटू हॅरी केनने नोंदवला. “हंगामाची सुरुवात जेतेपदासह करणे आमच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.**



आमचा आत्मविश्वास दुणावला असून बुंडसलिगाच्या नव्या हंगामासाठी आम्ही सज्ज आहोत,” असे केन म्हणाला. केनचे हे कारकीर्दीतील दुसरे जेतेपद होते. मे महिन्यात बायर्नने ‘बुंडसलिगा’ जिंकली होती. त्या वेळी केनने पहिल्या जेतेपदाचा अनुभव घेतला होता. जर्मन सुपर चषकात केननेच बायर्नला आघाडी मिळवून दिली. त्याने १८व्या मिनिटाला हा गोल केला.

यानंतर बायर्नने चेंडूवर ताबा राखला होता. तसेच त्यांनी गोलच्या काही संधीही निर्माण केल्या, पण त्यांना मध्यंतरापर्यंत केवळ एका गोलच्या आघाडीचे समाधान लाभले. उत्तरार्धातही बायर्नचे वर्चस्व राहिले. सामन्याच्या ७७व्या मिनिटाला सर्ज गनाब्रीच्या पासवर लुइस डियाझने गोल करत बायर्नची आघाडी दुप्पट केली. नव्या हंगामापूर्वी बायर्नने डियाझला इंग्लिश क्लब लिव्हरपूलकडून आपल्या संघात समाविष्ट करून घेतले. त्याने पहिल्याच सामन्यात गोल करत हा विश्वास सार्थ ठरवला. यानंतर स्टुटगार्टने पुनरागमनाचा प्रयत्न केला. स्टुटगार्टचा आघाडीपटू निक वोल्टेमेडने मारलेला फटका बायर्नचा गोलरक्षक मॅन्युएल नॉयरने अप्रतिमरीत्या अडवला. ९० मिनिटांनंतरच्या भरपाई वेळेत जेमी लेव्हलिंगने स्टुटगार्टचे गोलखाते उघडले. मात्र, त्यांना दुसरा गोल करता आला नाही आणि बायर्नने जेतेपद पटकावले.

## १८व्या मिनिटाला हा गोल केला

आमचा आत्मविश्वास दुणावला असून बुंडसलिगाच्या नव्या हंगामासाठी आम्ही सज्ज आहोत,” असे केन म्हणाला. केनचे हे कारकीर्दीतील दुसरे जेतेपद होते. मे महिन्यात बायर्नने ‘बुंडसलिगा’ जिंकली होती. त्या वेळी केनने पहिल्या जेतेपदाचा अनुभव घेतला होता. जर्मन सुपर चषकात केननेच बायर्नला आघाडी मिळवून दिली. त्याने १८व्या मिनिटाला हा गोल केला.

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। सोमवार।
। दि. 18 ऑगस्ट 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## सिंधुदुर्ग जिल्हा उत्कर्ष मंडळाचा 47 वा वार्षिक

# कौटुंबिक स्नेहमेळावा उत्साहात साजरा!

### प्रा. बाळकृष्ण रामचंद्र लळीत यांचा "सिंधुदुर्ग भूषण" पुरस्काराने सन्मान

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सिंधुदुर्ग जिल्हा उत्कर्ष मंडळाचा ४७ वा वार्षिक कौटुंबिक स्नेहमेळावा स्वातंत्र्यदिनाच्या शुभमुहूर्तावर शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट रोजी ग. दी. माडगुळकर नाट्यगृह येथे मोठ्या उत्साहात पार पडला. हजारोंच्या संख्येने सिंधुदुर्गवासियांनी हजेरी लावून हा सोहळा अविस्मरणीय ठरविला.**

संस्थापकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून औपचारिक उद्घाटन करण्यात आले. या स्नेहमेळाव्यादरम्यान भरतनाट्यम, कोळीगीते, देशभक्तीपर गीतांवर नृत्य, वेशभूषा स्पर्धा आदी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मंडळातील सभासदांच्या कुटुंबियांनी सादर केलेल्या कलाविष्कारांनी उपस्थित प्रेक्षकांची मनं जिंकली. धनश्री मेंडजोगी व कोमल शिरभाते यांनी परीक्षक म्हणून भूमिका निभावली.




यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मंडळातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच कार्यक्रमाच्या अखेरीस लकी ड्रॉ काढून सभासदांना आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात आली.

या सोहळ्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू मा. पांडुरंग साळगावकर यांच्या हस्ते तसेच मंडळाचे अध्यक्ष श्री. अजय संभाजी पाताडे यांच्या उपस्थितीत प्रा. बाळकृष्ण रामचंद्र लळीत यांना "सिंधुदुर्ग भूषण" या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला

स्नेहमेळाव्याच्या यशस्वितेसाठी उत्सव समितीचे अध्यक्ष पराग पालकर तसेच आनंद साटलकर, संजय सावंत, अनिल सावंत, नंदकिशोर सावंत, बाळकृष्ण गुरव, विश्वास राणे, महादेव बागवे, विजय अहिरे, संतोष गावडे, श्री कोरगावकर, विष्णू भुते, विजय महाडिक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांमध्ये सुशील वारंग (जनरल मॅनेजर, स्किल डेव्हलपमेंट- कमर्शियल व्हेईकल, टाटा मोटर्स), राजू मिसाळ (माजी उपमहापौर), सुजाता पालांडे (नगरसेविका व भाजपा महिला अध्यक्षा), सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे, उद्योजक प्रमोद राणे, अरविंद पालव, रमेश बागवे, प्रकाश बापार्डेकर (अध्यक्ष, पांचाळमय ब्रम्ह सुतार), यशवंत कन्हेरे (पी. चि. मनपा स्वच्छता ब्रँड एम्बेसेडर), संदीप साळुंखे (अध्यक्ष, खेड युवा शक्ती फाउंडेशन), राहुल ढेबे, मयुरेश खानोलकर, शिवाजी चौगुले, अभय नरडवेकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष अजय पाताडे यांनी केले. तर सूत्रसंचालन संतोष साटम, संजय सावंत, भूमिका सावंत आणि क्षितिजा साटलकर यांनी रंगतदार पद्धतीने पार पाडले.

सिंधुदुर्ग जिल्हा उत्कर्ष मंडळाचा हा ४७ वा वार्षिक स्नेहमेळावा केवळ सांस्कृतिक संमेलन न ठरता, सिंधुदुर्गवासियांना एकत्र आणणारे, कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारे आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारे असे एक आगळेवेगळे व्यासपीठ ठरले

---

## व्ही. के. माटे हायस्कूलमध्ये देशभक्तीचा उत्साह!

### 79 वा स्वातंत्र्य दिन साजरा जल्लोषात; विद्यार्थ्यांचे बँड, समूहगान आणि कथाकथनाने मन जिंकले

। पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मोरया शिक्षण संस्थेच्या व्ही. के. माटे हायस्कूलमध्ये ७९ वा स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहात, देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा विश्वस्त श्री. स्वप्निल शेडगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कुमारी प्रांजल जाधव व डॉ. राजेश्वर हेंद्रे उपस्थित होते.**

कार्यक्रमाची सुरुवात



भारतमातेच्या पूजनाने झाली. यानंतर ध्वजारोहण करण्यात आले आणि विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी ध्वजाला सलामी दिली. राष्ट्रगीत, ध्वजगीत व राज्यगीतांचे सुमधुर गायन काव्या साताळकर, अनुष्का लोहार व शार्दुल देशिंगे यांनी पेटी व तबल्याच्या साथीने सादर केले. प्रतिज्ञावाचन श्री. हनुमंत हुचगोळ यांनी केले. शाळेच्या एमसीएफ, स्काऊट आणि गाईड पथकांनी संचलनाद्वारे उपस्थित मान्यवरांना मानवंदना दिली. संचलनाचे नेतृत्व तनिष्का भालेराव, माहेश्वरी फाटक, आयुष जाधव आणि अविष्कार बदर यांनी केले.

शाळेच्या प्राचार्या व कार्यवाह सौ. इंद्रायणी माटे पिसोळकर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात देशप्रेम आणि देशभक्तीवर प्रभावी मार्गदर्शन केलं. त्यानंतर डॉ. राजेश्वर हेंद्रे लिखित "अव्यक्त भावपत्रे" या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. पालकांच्या मनातील भावनांना लेखनाच्या माध्यमातून मांडणाऱ्या या पुस्तकाची माहिती प्राचार्यांनी दिली.

#### देशभक्तीपर संस्कारांची साक्ष...

विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले. स्काऊट मास्टर श्री. हनुमंत हुचगोळ, श्री. अनिल तिटकारे आणि गाईड कॅप्टन सौ. अनिता बोरसे यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांमध्ये विशेष ऊर्जा निर्माण झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये संस्थेचे कार्यकारी सदस्य सौ. प्रतिभा कुलकर्णी, श्री. देव, खजिनदार श्री. रणजीत सावंत, उपमुख्याध्यापक श्री. दिलीप कुमावत, शिक्षक समन्वयक श्री. संजय खेडकर व पर्यवेक्षिका मैत्रेयी राजे यांचे योगदान मोलाचे होते. सूत्रसंचालन श्री. पंकज देव व श्री. हनुमंत हुचगोळ यांनी तर आभार प्रदर्शन सौ. मैत्रेयी राजे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध, नेटका आणि उत्साहात पार पडत शाळेच्या देशभक्तीपर संस्कारांची साक्ष देत गेला.

Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.


PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26

### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

# ‘डीबीटी’च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप!

## अतिरिक्त आयुक्तांनी शाळांना अचानक भेट देत केली शालेय साहित्याची तपासणी

।पिंपरी चिंचवड।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी आज सकाळी अचानक महापालिकेच्या चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली. यावेळी त्यांनी बाकावर बसून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शालेय साहित्याची तपासणी केली. यंदाच्या वर्षी मिळालेले साहित्य कसे वाटते, याबाबत विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियाही त्यांनी जाणून घेतल्या.**



> “विद्यार्थ्यांना ‘डीबीटी’च्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक साहित्याचा दर्जा तपासणे व विद्यार्थ्यांच्या या साहित्याबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी आज चऱ्होली बु. येथील पंडित जवाहरलाल नेहरू प्राथमिक शाळेला भेट दिली होती. तसेच महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या योजनांचा त्यांना फायदा कितीपत होत आहे? भारत दर्शन सारख्या उपक्रमांची विद्यार्थ्यांना माहिती आहे का? हे जाणून घेण्याचा उद्देशही या भेटीमागे होता. आगामी काळामध्येही अशा प्रकारे अचानक शाळांना भेट देऊन तपासणी सुरू राहतील.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील,**
> अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. महापालिकेच्या १४६ शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा, या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य किट मिळाले आहे का, याची तपासणी आता शिक्षण विभागाने सुरू केली आहे. त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी थेट आज चऱ्होली बु. येथील शाळेला अचानक भेट देत तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांसोबत संवाद साधत त्यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचा दर्जा कसा आहे, हे देखील जाणून घेतले.

चऱ्होली बु. शाळेतील जवळपास ९० टक्के विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे कीट मिळाले असल्याचे निर्देशनास आले. तर उर्वरीत विद्यार्थ्यांना अद्याप कीट का मिळाले नाही, याबाबत अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. त्यानंतर तातडीने शैक्षणिक साहित्याचे कीट मागवून घेत विद्यार्थ्यांना वाटप केले. यावेळी सदर शैक्षणिक कीट स्वतःच्या हाताने फोडून त्यामध्ये असणाऱ्या साहित्याची तपासणी जांभळे पाटील यांनी केली. यावेळी काही विद्यार्थ्यांना गणवेश व शूज मिळाले नसल्याचे लक्षात आल्यानंतर जांभळे पाटील यांनी विद्यार्थ्यांना दोन दिवसाच्या आत गणवेश व शूज देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याचा पुरेपूर वापर होईल, याची काळजी घेण्याच्या सूचनाही शाळेच्या शिक्षकांना दिल्या.

### शालेय पोषण आहाराची घेतली माहिती

विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत देखील अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी माहिती घेतली. तसेच पोषण आहाराची गुणवत्ता आणि प्रमाण तपासण्यासाठी तो स्वतः खाऊन पाहिला. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता ही उत्तमच असावी. त्याची वेळोवेळी शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांनी तपासणी करावी. त्यामध्ये कुठलाही हलगर्जीपणा करू नका, असे निर्देशही त्यांनी दिले.





EDUCATING MIND & HEART
Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13k+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org